# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रारीची तपासणी सूची

**क्र. रामाआ/तक्रार/१४५/२०२२/धुळे**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. सागर रमेश सुर्यवंशी<br>मु. पो. नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. | उपविभागीय अभियंता,<br>ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पंचायत समिती,<br>शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

**सुनावणी दिनांक — ३०/०६/२०२३**

| तक्रार अर्जाचा दिनांक | द्वितीय अपील क्रमांक | आयोगाने दिलेल्या निर्णयचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या अहवालाचा दिनाक |
|---|---|---|---|
| २१/०३/२०२२ | २५४९/२०१९/धुळे | १४/०९/२०२१ | १९/०५/२०२२ |

तक्रारदार यांनी दि.२१/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " आयोगाने माहिती पुरविण्या संदर्भात आदेश केले होते. परंतु मला यांनी कुठल्याही प्रकारची माहिती पुरवलेली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी ह्या दोघांवर माहिती दडपण्याचा प्रकार केला म्हणुन दंडात्मक कार्यवाही व्हावी व सामान्य प्र.वि.मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक केमाअ-२००७/७४/प्र.क्र./५४/०७/०६ नुसार कार्यवाही व्हावी.

२. सदर तक्रारीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित असुन तक्रारदार अनुपस्थित होते.

३. आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २५४९/२०१९/धुळे वरील दिनांक १४/०९/२०२१अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पंचायत समिती कार्यालय, शिंदखेडा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३/०६/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी."

४. तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २१/०३/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०३/०६/२०१९ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार

माहिती पुरविली नसल्याने मागितलेली माहिती मिळावी, अशी विनंती सदर तक्रार अर्जान्वये तक्रारदार यांनी केली आहे.

५. तक्रारदार यांनी मुळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०६/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २००१ ते सन २०१९ या कालावधीतील पुढील प्रमाणे माहिती मागितली होती. १) दिनांक २२/०५/२०१९ चे तक्रारी अर्जातील विषया संदर्भात आपल्या कार्यालयाने वर्षे २००१ ते २०१९ या कालावधीतील नरडाणा येथिल पाणी पुरवठा शासनाकडुन संदर्भात मंजुर झालेली निधी त्यातुन निर्माण झालेल्या बाबी आणि त्याबाबींची वर्तमान सद्यस्थितीत असलेली अवस्था, झालेला एकूण खर्च, योजना ताब्यात घेतल्याचा पुराव्याची कागदपत्र याबाबी संदर्भात आपण केलेल्या सविस्तर अहवालाची प्रत मिळावी, २) नरडाणा ग्रामपंचायतच्या उत्पन्नातील आणि पाणी पट्टी कराच्या गोळा झालेल्या रक्कमेतून वर्षे २००१ ते २०१९ या कालावधीत झालेल्या खर्चाची रक्कम आणि त्यातून निर्माण केलेल्या बाबींची वर्तमान स्थीतीतील अवस्था संदर्भात सविस्तर चौकशी अहवालाची प्रत मिळावी, ३) शासन निधी, ग्रामनिधी, ग्रामपंचायतीचे उत्पन्न, या रकमेतून पाणि पुरवठ्यासाठी निर्माण झालेल्या बाबी आणि ग्रामपंचायत मालमत्ता रजिष्टर डेडस्टाक रजिष्टर नोंदविलेले आहे यांची पडताळणी अहवालाची प्रत मिळावी, याबाबत माहिती मागितली होती.

६. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदर प्रकरणी तक्रारदार यांचा माहिती अर्ज दिनांक ०७/०६/२०१९ रोजी प्राप्त झाला असुन त्यांनी सन २००१ ते सन २०१९ या कालावधीतील माहिती मागितली असुन सदर कार्यालयातील उपलब्ध माहिती बाबत मुद्दा क्र. १ ची माहिती सशुल्क रु. ५२०/- भरुन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. १९० दिनांक २६/०६/२०१९ पाठविले होते. तसेच मुद्दा क्र. २ व ३ बाबतची माहिती ही ग्रामविकास अधिकारी नरडाणा यांचेकडे असल्याने माहिती अर्ज दिनांक २४/०६/२०१९ रोजी वर्ग करण्यात आला आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी प्रथम अपिल सादर केले सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहितीसाठी शुल्क भरुन त्यांना सदर माहिती ०७ दिवसाच्या आत पुरविण्यात येईल व ग्रामपंचायत नरडाणा विषयी संबंधित माहितीसाठी आपला अर्ज सदर ग्रामपंचायतीस वर्ग करण्यात आला असुन ग्रामपंचायतीशी संबंधित माहिती त्यांच्या कडुन प्राप्त करुन घ्यावी, असे निर्देश देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही तक्रारदार यांनी माहिती शुल्क भरले नाही. वास्तविक तक्रारदार यांनी माहिती अर्जात नमुद केले आहे की, माहिती प्राप्त करण्यासाठी फी भरण्यास तयार आहे. तरी देखील माहिती शुल्क न भरता प्रथम अपिल अर्ज केला व द्वितीय अपिल देखील केले.

२. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती बाबत माहिती शुल्क कळविले असल्याचे दिसुन येते. तक्रारदार यांनी माहिती शुल्क न भरल्याने जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याचे दिसुन येते. तक्रारदार यांनी स्वत: माहिती अर्जात नमुद केले आहे की, माहिती बाबत फी भरण्यास तयार आहे. तरी देखील माहिती शुल्क न भरता प्रथम अपिल व द्वितीय अपिल केल्याचे दिसुन येते. वास्तविक प्रथम अपिल आदेशात देखील माहिती शुल्क भरुन माहिती प्राप्त करावी असे निर्देश असल्याचे दिसुन येते. यावरुन तक्रारदार यांनी माहिती शुल्क भरले नसल्याने माहिती पासुन वंचीत राहण्यास ते स्वत: जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे प्रस्तुत तक्रार चौकशी योग्य नसल्याने सदर तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** आ-२१७८ 01 DEC 2023